# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:26.02.2026** **वार:गुरुवार**

---

- रोगाला प्रतिबंध करणं हे केवळ व्यक्तीसाठी लाभदायक नाही तर त्यामुळं देशाच्या आरोग्य व्यवस्थेवरील भार देखील कमी होतो असं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचं प्रतिपादन, बुलढाणा जिल्ह्यात शेगाव इथं राष्ट्रीय आरोग्य मेळ्याचं उद्घाटन.

- मुंबईतील बांधकाम प्रकल्पांचं निरीक्षण 'आयओटी-एआय'द्वारे होणार

- राज्यसभेच्या सात जागांकरिता द्विवार्षिक निवडणुकीची घोषणा आणि

- क्रिकेट विश्वचषकतील आव्हान टिकवून ठेवण्याकरीता भारतासाठी आज महत्वाचा सामना.

**<u>मुर्मू-बुलढाणा</u>**

आयुर्वेद, योग आणि इतर आयुष प्रणाली केवळ रोगांवर उपचार करण्यापुरत्या मर्यादित नाहीत तर त्या समग्र आरोग्य व्यवस्थापनाचे शास्त्र असल्याचं प्रतिपादन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी केलं आहे. बुलढाणा जिल्ह्यातील शेगाव इथं चार दिवसांच्या राष्ट्रीय आरोग्य मेळ्याचे उद्घाटनप्रसंगी उपस्थितांना संबोधित करताना त्या काल बोलत होत्या. आयुष मंत्रालय आणि अखिल भारतीय आयुर्वेदिक कॉंग्रेसच्या सहकार्याने याचं आयोजन करण्यात आलं आहे. रोगाला प्रतिबंध करणे हे केवळ व्यक्तीसाठी लाभदायक नाही तर देशाच्या आरोग्य व्यवस्थेवरील भार देखील कमी करते असं सांगताना त्या म्हणाल्या . . .

राज्यपाल आचार्य देवव्रत याप्रसंगी म्हणाले की राजमाता जिजाऊंच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या बुलढाणा जिल्ह्यातील शहरांमध्ये हा आरोग्य मेळावा पार पडत असल्याची बाब  प्रशसंनीय आहे.

आयुष मंत्री प्रतापराव जाधव यांनी तीन नवीन अखिल भारतीय आयुर्वेद संस्था स्थापन करण्याची घोषणा याप्रसंगी केली.

**विधानपरिषद**

पुणे-नाशिक हायस्पीड रेल्वे प्रकल्पाच्या मूळ आरेखनामुळं खोडद इथल्या जीएमआरटीच्या अँटेनाला व्यत्यय येत असल्यानं या रेल्वे मार्गाच्या मर्यादित बदलासाठी विशेष तज्ज्ञांची समिती नेमून सकारात्मक मार्ग काढला जाईल. या मार्गाची पर्यायी आखणी करून या मार्गातील सुटलेली गावे  रेल्वे मार्गास जोडली जातील, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल विधान परिषदेत प्रश्नोत्तराच्या तासात सांगितले. सदस्य सत्यजित तांबे यांनी याविषयी प्रश्न उपस्थित केला होता. ३२ देशांचा सहभाग असलेली जीएमआरटी वेधशाळा असल्यानं तिच्या नियमावलीत बदल करणं शक्य नसल्याचं केंद्र शासनानं स्पष्ट केलं आहे.

मुंबईतील सर्व बांधकाम प्रकल्पांवर प्रभावी आणि पारदर्शक देखरेख राहावी यासाठी आयओटी आणि कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित मॉनिटरिंग प्रणाली विकसित करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. सर्व बांधकाम प्रकल्पांवर १०० टक्के नियंत्रण आणि निरीक्षण सुनिश्चित करण्यासाठी यंत्रणा उभारण्याबाबत बृहन्मुंबई महानगरपालिका प्रशासनाला स्पष्ट निर्देश देण्यात आले असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानपरिषदेत प्रश्नोत्तराच्या तासात दिली. ते म्हणाले...

राज्यातल्या शासकीय आणि इतर पात्र कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यात जुलै 2025 पासून 3 टक्के वाढ करून 55 वरून 58 टक्क्यावर नेण्याचा निर्णय राज्य सरकारनं घेतल्याचं राज्यमंत्री आशिष जैस्वाल यांनी काल विधानपरिषदेत सांगितलं.

राज्य परिवहन महामंडळाची शिवशाही बस वारंवार बिघडत असल्याने, तसंच प्रवाशांचा प्रतिसाद कमी असल्याने त्याचं रूपांतर निमआराम आणि साध्या वाहनांमध्ये करण्यात येणार असल्याची माहिती सरकारकडून काल विधानपरिषदेत लेखी उत्तरद्वारे देण्यात आली.

अन्न आणि औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवळ यांच्या कार्यालयावर भ्रष्टाचारविरोधी पथकानं छापा टाकल्याचा मुद्दा सभागृहात चर्चेला घेण्याची सूचना फेटाळल्याची माहिती सभापतींनी दिली. याच्या निषेधार्थ विरोधी पक्षाच्या सदस्यांनी घोषणा दिल्या. गदारोळातच सभापतींनी लक्षवेधी सूचना पुकारल्यानंतर विरोधकांनी सभात्याग केला.

रोजगार हमी योजनेतल्या कोणत्याही रोजगार सेवकाला कामावरून कमी केले जाणार नाही, असं मंत्री भरत गोगावले यांनी काल विधानसभेत स्पष्ट केलं. मागणीनुसार काम देण्याचं धोरण कायम राहील आणि कोणत्याही प्रकारचा भेदभाव केला जाणार नाही, असं ते म्हणाले. रोजगार हमी योजना आणि घरकुल योजनेच्या निधीसंदर्भात पाठपुरावा करुन अधिवेशन काळात माहिती सभागृहासमोर ठेवण्याची सूचना अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी केली. यासाठी केंद्राकडून निधी मिळत नसेल तर राज्य सरकारनं स्वतःच्या तिजोरीतून निधी द्यावा अशी मागणी काँग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी केली.

**निवडणूक**

महाराष्ट्र विधानसभेच्या निर्वाचित सदस्यांकडून सात सदस्यांची राज्यसभेसाठी द्विवार्षिक निवडणूक घेण्यात येणार असल्याची अधिसूचना महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयानं काल प्रकाशित केली. ५ मार्चपर्यंत अर्ज दाखल करता येतील. छाननी ६ मार्च आणि निवडणूक लढविली गेल्यास मतदान १६ मार्चला होणार आहे.

**महाब्रिस्टॉल-साताराजिमाका-प्रशांत**

राज्यातील गुणवंत विद्यार्थ्यांना जागतिक दर्जाच्या उच्च शिक्षणाच्या अधिक संधी उपलब्ध करून देण्यासाठी महाराष्ट्र शासन आणि ब्रिस्टॉल विद्यापीठ मुंबई कॅम्पस प्रायव्हेट लिमिटेड यांच्यात विधानभवन इथं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत सामंजस्य करार करण्यात आला.ब्रिस्टॉल विद्यापीठाच्या सहकार्यामुळे गुणवत्तापूर्ण शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना संधी उपलब्ध होणार आहे. उच्च आणि तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, ब्रिस्टॉल विद्यापीठाच्या कुलगुरू आणि अध्यक्षा प्रा.एव्हलिन वेल्च, मुख्य संचालन अधिकारी लुसिंडा पारआदी यावेळी उपस्थित होते.

**एसटीवेतन**

राज्यातील ८६ हजार कर्मचाऱ्यांना दिलासा देतमहाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळच्या थकीत वेतनवाढीचा फेब्रुवारीमधील हप्ता जमा करण्यात आला असल्याची माहिती  परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली आहे.

**विश्वमराठीसंमेलन**

नाशिक इथं उद्यापासून १ मार्च पर्यंत मराठा विद्याप्रसारक समाजाच्या केटीएचएम महाविद्यालयाच्या प्रांगणात चौथे विश्व मराठी संमेलन होत आहे. या संमेलनानिमित्त विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. त्यासाठी कविवर्य कुसुमाग्रज नगरीत विविध मंच उभारण्यात आले आहेत.

**मुंबईअर्थसंकल्प**

मुंबई महापालिकेचा ८० हजार ९५२ कोटी रुपयांचा अर्थसंकल्प आयुक्त भूषण गगराणी यांनी स्थायी समितीचे अध्यक्ष प्रभाकर शिंदे यांच्याकडे काल सादर केला. वर्तमान आर्थिक वर्षाचा अर्थसंकल्प साडे ७४ हजार कोटी रुपयांचा होता. मुंबई महापालिकेची राज्य सरकारकडे १० हजार कोटी रुपयांहून अधिक देणी शिल्लक असल्याचं अर्थसंकल्पात नमूद करण्यात आलं आहे.

**नाथषष्ठी**

पंढरपूरनंतर छत्रपती संभाजीनगरमधील राज्यातीलसर्वात मोठी नाथषष्ठी यात्रा येत्या ५ मार्चपासून सुरू होत आहे. त्या अनुषंगाने प्रशासनाने तयारी केली आहे. नाथषष्ठीला साधारणपणे ५ ते ७ लाख भक्त वारकरी येणार असून या वारकऱ्यांना पहिल्यांदाच गोदावरी नदीच्या शुद्ध पाण्यात स्नान करता येणार आहे.

**लोणार**

बुलढाणा जिल्ह्यात लोणार इथल्या जगप्रसिद्ध खाऱ्या पाण्याच्या सरोवरांमध्ये अचानक गोडे पाणी जाऊन पाणी पातळीत मोठी वाढ होत आहे. तसेच कळमजा देवीच्या मंदिरात मोठ्या प्रमाणावर पाणी साचल्याने मंदिर बंद झाल्याने नागरिकांनी या समस्या सोडवण्याची मागणी करत साखळी उपोषण सुरू केले आहे.

**विरामचिन्हेदिवस**

मराठीचे व्याकरणकार, भाषांतरकार आणि मराठी विरामचिन्हाचे आद्य प्रणेते मेजर थॉमस कँडी यांच्या दीडशेव्या स्मृतीदिनाच्या निमित्त छत्रपती संभाजीनगर इथं मराठवाडा साहित्य परिषदेच्यावतीनं आज मराठी विरामचिन्हे दिवस साजरा करण्यात येणार आहे.

**पुरस्कार**

राज्यातील ४५ लाख शेतकऱ्यांना दिवसा वीजपुरवठा करण्यासाठी राज्य शासनाच्या मुख्यमंत्री सौर कृषिवाहिनी द्वितीय योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी महावितरणला काल नवी दिल्ली इथं गौरविण्यात आलं. केंद्रीय नवीन नवीकरणीय ऊर्जा राज्यमंत्री श्रीपाद नाईक यांच्या हस्ते मुख्य अभियंता श्री. ज्ञानेश कुलकर्णी यांनी हा पुरस्कार स्वीकारला. जगातील सर्वांत मोठा विकेंद्रीत सौर ऊर्जा प्रकल्प असलेल्या मुख्यमंत्री सौर कृषिवाहिनी द्वितीय योजना २.० मध्ये आतापर्यंत १९८५ कृषीवाहिन्यांचे सौर ऊर्जीकरण

करण्यात आले असून राज्यातील १० लाख २५ हजारांपेक्षा अधिक शेतकऱ्यांना सिंचनासाठी दिवसा वीजपुरवठा उपलब्ध झाला आहे.

**<u>निधन</u>**

सांगलीमधील उद्योजक रामविश्वास दूध केंद्राचे जेष्ठ संस्थापक संचालक रामचंद्र गवळी यांचं काल निधन झालं. ते 86वर्षांचे होते.१९६१ साली त्यांनी सायकलवरून दूध संकलन आणि दुधाचं वितरण करण्याचा व्यवसाय सुरू केला. सांगली आणि कोल्हापूर जिल्हा दूध व्यवसायिक संघटनेच्या कार्यामध्येही ते सक्रियपणे कार्यरत होते.

**<u>क्रिकेट</u>**

टी-२० विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत सुपर ८ च्या फेरीत भारतीय संघासमोर आता 'करा किंवा मरा' अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. आज चेन्नईतीलएमए चिदंबरम स्टेडियमयेथे भारताचा सामना झिम्बाब्वेशी होणार असून उपांत्य फेरीच्या दृष्टीने हा सामना अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे.सध्या गट एकमध्ये भारत अत्यंत कमी सरस धावगती राखत तिसऱ्या स्थानावर आहे. तर वेस्टइंडिजपहिल्या तर दक्षिण आफ्रिका दुसऱ्या , झिम्बाब्वेचौथ्या स्थानावर आहे. या फेरीत भारतीय संघाचे झिम्बाब्वे आणि वेस्ट इंडिजविरुद्धचे सामने अद्याप बाकी आहेत. उपांत्यफेरीत पोहोचण्यासाठी भारताला मोठ्या फरकाने विजय आवश्यक आहे. शिवाय इतर संघांच्या जय-पराजय आणि सरस धावगतीवर भारताला अवलंबून राहावं लागणार आहे.

**<u>हवामान-</u>**

पश्चिम महाराष्ट्र आणि मराठवाड्यात हवामान अंशतः ढगाळ, अन्यत्र कोरडं राहण्याचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं,नमस्कार.